कसे सोडून गेलात निमूटपणे कोणालाही न सांगता. एवढी 57 वर्षांची संगत सोबत टाकून गेलात. जरा तरी विचार केलात का आपल्यामागे कुणाचा आधार आहे मला. 57 वर्षांचा काळ इतिहासाच्या दृष्टिने अल्प असेल पण लग्नाच्या बाबतीत? दोन जीव एकत्र येतात भांडतात रुसतात परत एक होतात. आतां कोणाला सांगू की तुम्ही मोठे आहात, तुमचा अधिकार आहेच कुणालाही सांगण्याचा व बोलण्याचा. सगळ्या संसाराचा भार आता माझ्यावर येणार. होत्याच नव्हते असें एका क्षणांत घडते का? माझे तर ऐकल्यापासून पायच गेले. शक्ति गळल्यासारखी झाली. उठतां येईना. त्यावेळेचं वर्णन कसं करुं. मोठी मुलगी लीना जवळ होती म्हणून बरे. तिने सगळें मॅनेज केले भराभर फोन केले. मोठी मुलगी -- लहानपणांपासून मोठीच राहिली. कधी भावल्यानी खेळली नाही की भातुकलीत रमली नाही. बुद्धीची झेप मात्र मोठी. एकदम 3रीत गेली. 11वी मॅट्रिक झाल्यावर दोन्ही भावंडाना गणित फिजिक्स पासून मदत केली. माझ्या मुलाना अभ्यास करा असे आम्ही म्हटलेंच नाही. नाही तर आताची मुले। पहिल्या मुली नंतर दुसरी मुलगी 2 वर्षांनी झाली तेव्हा मात्र आईवडीलांकडे बाळंतपणा साठी गेले नवव्या महिन्याचे 2 दिवसच झाले होते. मुंबई ते देवरूख बसचा प्रवास होता. रस्ते काही तेव्हा डांबरी नव्हते. पण एकटीनेच प्रवास केला वडीलानी 4 थ्या दिवशी विचारले अजून अवकाश आहे ना। मी हो
म्हटले. मग आज माझ्या मित्रांसाठी ओल्या पावट्याची उसळ नारळाची चटणी व 4 दुधाच्या दशम्या करून ठेव. मी बर म्हटले. पण माझ्या चेहऱ्याकडे पाहून वडीलानां कशाचा तरी बोध झाला असावा. पण बोलले नाहीत. वडील 1 च्या सुमारास कोर्टात गेले. आमची दोन घरे होती. तो एक वेगळाच इतिहास आहे. वर दाराला कुलूप लावून वडील कोर्टात गेले. आईच माझ्या सोवळ ओवळ फार. सर्व सामसूम झाल्यावर विहीरींतून पाणी काढून ती अंगावर ओतायची. ओलेल्यानी रस्त्यावर पाणी शिंपत ती देऊळा पर्यंत यायची. मग सर्व पूजेची तयारी आहे हे पाहून धूतवस्त्र (सोळयांतले) नेसून पूजा करायची त्यानंतर जेवण. चुलीवरचा गरम भात व वरण आणि पोळी भाजी असा थाट असे. त्यावेळी आमच्याकडे एक भिकारीण यायची. तिला पण गरम भात व वरण असे मिळायचे. रेशनचे दिवस असून सुध्दां. ती आली. मी बाहेर झोपाळयावर बसले नी पोटात कळा यायला एकच गांठ पडली. वकीलणी, पोरगी बघ कशी करतेय. कळा येताहेत तू पटकन उरक. असे ती आईला म्हणाली. तू जेव व सावकाश ये अस मी आईला सांगितले पण आईचेच हृदय ते. ती पटकन उठली भरल्या पानावरून. गड्याला हांक मारून खोली रिकामी करायला सांगितले. पण हा गडी होता कुठे। तो सगळे आटोपल्यावर नदीवर जाऊन सर्व आटपून आंघोळ करून यायचा. मग दुपारी आमच्याकडेच जेवायला असे. आईने शेजारणीला हांक मारून त्यांची पुतणी घरात आहे का विचारले कारण ती शाळेत जात नसे. शाळेची वेळ असल्याने सर्वजण शाळेत. माझ्या तीन बहीणी पण. शालूला सुईणीकडे बोलवायला पाठविले. गडी आला, खोली स्वच्छ केली. भाताची (साळीची) पोती ठेवली होती ती काढली. नंतर बाज आणली शेजाऱ्यांचीच. तो पर्यंत सुईण पण आली. नंतर 4 च्या सुमारास माझी सुटका झाली. घड्याळांत वेळ पहा असे माझ्या बहिणींना सांगितले होते. तो पर्यंत त्या शाळेंतून परतल्या होत्या. त्यानी वेळ लिहुन ठेवली. झाले. ही बातमी वडीलांचे मित्र होते त्यांनी त्यानां कोर्टात दिली. वडील उत्तम ज्योतिषी होते. हे पण आल्यावर त्यांनी पत्रिकेसाठी वेळ विचारली 4 वाजले होते असे बहिणीने सांगताच ते म्हणाले घड्याळ 10 मिनिंट पुढे आहे. 6 मिनिटांत लग्न बदलते. वसंत लाडोबा म्हापणकर तेव्हा भविष्य लिहीत असत. गरोदर स्त्रियानां कन्यारत्न प्राप्त होईल. वडीलांची नोकरी जाईल. जीवनात भरपूर चढ उत्तार होईल. बुध्दीवान कन्यारत्न असेल हे भविष्य म्हापणकरांचे. वेळात फरक झाला. जन्मापासुन तिच्या कटकटी सुरू झाल्या. कैवल्यधाम मधे आम्ही होतो. यांना पीएचडी ची स्कॉलरशिप तिथूनच मिळाली होती, त्यांचा बॉण्ड होता. तुम्ही नोकरी सोडून जाऊ शकता. तुम्ही तरूण आहांत. तुम्हाला बॉण्ड मधून मुक्त करीत आहो हे शब्द आठवतात. छाया (दुसरी मुलगी) फक्त 3, 4 महिन्यांची होती त्यावेळी अनएम्लॉयमेंट भरपूर. 1952 चा काळ होता. माझा भाऊ

वकील, मेव्हणे प्रोफेसर, व हे असे तिघेही उच्चाशिक्षित लोक बेकार होते. मग नोकरीवा शोध सुरु. नाही म्हणायला डोक्यावर छप्पर होते. सासऱ्यांचा आधार होता. पीएचडी माणसाला शिक्षक म्हणून सुध्दां नोकरी मिळत नव्हती. त्यावेळी जर त्यांनी पुण्याला जाऊन नोकरीचा प्रयत्न केला असता तर कदाचित बस्तान बसले असते. पण दैवगति. विक्रमाला सुध्दां शनिच्या साडेसातीचा त्रास झाला. मग हयांच्यासारख्या सामान्य माणसाची काय कथा. व्यारा, खाडंवा व जबलपूर अशी आमची भ्रमंती घडली. खांडव्याला असताना मी बीए पास झाले नागपूर युनिव्हर्सिटीची. व मला मुलगा झाला. त्यावेळी त्याचे ज्योतिष असे होते -- 6 महिन्यांत लेक्चरर म्हणून कुठेतरी पित्याला नोकरी लागेल. ह्यांचा एक दोस्त होता त्याने मात्र जबलपूर ची जाहिरात पाठविली होती. ह्यानी अर्ज केला, ती नौकरी मिळाली व गाडी मार्गाला लागली. सासरे पण येऊन राहिले. घटस्फोटित नणंदेला नागपूरला दाईच्या ट्रेनिंगला पाठविले. त्यांच्या मुलीला मात्र मी माझ्या तीन मुलांबरोबर वाढविले. त्यांचा कोर्स पुरा झाला व त्यांना पांढरकवडयाला नोकरी लागली. जबलपूरला पगार अगदी कमी होता. पण भागत होते (कसबसे ) त्या दिवशी मी सहजच मागच्या दारी घरमालकांच्या सुनेबरोबर गप्पा मारत होते. इतक्यांत एक कुडबुड्या जोतिषि तिथे टपकला (बहुधा तेलंगी ब्राह्मण असावा). त्याला मराठी अवगत होते. माई तुझा हात बघतो. त्याने हात बघून भविष्य सांगितले. तुझ्या पतिला चांगली (पोस्ट) जागा मिळेल. वाहन ठेवशील. मुले शिकतील घर होईल वगैरे. हयानी मला विचारले की मी कोणाशी बोलत होते. मी आपली हयांची थट्टा केली - एक माणूस उच्चपदी होणार मोटरीतून फिरणार असे भविष्य कुडमुड्या ज्योतिषाने सांगितले आहे. दुसऱ्या दिवशी खरोखरच माझ्या दीरांचे पत्र आले. दरभंग्याला (बिहार) संस्कृतची जागा खाली आहे. मी अंमळनेर सोडणार नाही. तू नाहींतरी भरपूर गांवे पाहिलीस. इथे पण अर्ज कर, आपला मित्र तिथेच आहे. (शर्मा) साध्या कागदावर अर्ज कर, फॉर्म मागवून घे. दरभंग्याला अर्ज केला. अर्जानंतर जवळ जवळ 6 महिन्यानी इंटरव्ह्यूचा कॉल आला. वर्षानंतर पुन्हां बोलाविले सिलेक्शन झाले. त्यापूर्वी खूप डिस्कशन झाले.

---------------------------------------------------------------